| MHNS240021902024 | **नियमित दिवाणी दावा क्र.४२४/२०२४ मधील नि.क्र. ३७ वरील आदेश** |
|---|---|
| | श्री. अशोक सहादू भामरे<br>वि.<br>श्री. दादाजी सहादु भामरे |

प्रस्तुतचा अर्ज प्र.वादी यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होउन त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीत सादर केला आहे. सदर आदेश याच अर्जावर असल्याने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्याचा याठिकाणी उहापोह करण्यात आला नाही.

२. वादी यांनी सदर अर्जावरच त्यांचा खुलासा दाखल करून प्र.वादीच्या अर्जास प्रखर आक्षेप घेतला आहे. विलंब झाल्याचे कारण व किती दिवसांचा विलंब झाला याबाबत अर्जामध्ये नमुद नाही,असे कथन करुन अर्ज खर्च रुपये २०००/– सह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा तपशिलवार युक्तिवाद ऐकला.

४. अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी जाहीर होउन मिळण्याकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता सदर दावा दाखल केलेला आहे. प्र.वादी हे सदर दाव्यास त्यांची कैफियत दाखल करुन विरोध करत आहेत. सदर दावा हा स्थावर मिळकती संदर्भात आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांचे हक्कसंबंध गुणदोषारोवर सिध्द करण्याकामी परवानगी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. असे असले तरी, प्र.वादी यांस कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदर विलंब काही रक्कम खर्च म्हणुन त्यांच्याकडुन वादी यांना दिल्यास प्रकरणाचा उद्येश सफल होईल व सदर प्रकरण हे गुणदोषारोवर न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. सबब, निम्न आदेश.

## आ दे श

प्र.वादीचा नि.क्र.३७ वरील अर्ज त्यांनी वादी यांना रक्कम रुपये २००/– खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

प्रतिवादी यांनी कलम ०१ मधील पुर्तता केल्यास त्यांना कैफियत अभिलेखावर सादर करण्याची परवानगी देण्यात येते.

SHIPKULE CHARUDATTA

Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2025.03.10 12:44:08 +0530

**दि. १०/०३/२०२५** **(चारूदत्त उद्धव शिपकुले)**

**ठिकाण– सटाणा.** **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, सटाणा.**